नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २२/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

## जबरी चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील डेकोफर्न मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि.कंपनी एमआयडिसी बोरी येथे दि. २१/०७/२२ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अनिदीया आषिश चौधरी वय ४८ वर्ष, रा. गोकुल अपार्टमेंट, व्दारकापुरी नागपुर यांची कंपनी बंद असुन कंपनीचे साफ–सफाई करीता फिर्यादी हे लेबर यांना कंपनीमध्ये घेवुन आले असता कंपनीमध्ये दोन इसम चोरी करण्याचे उद्देशाने आले. ते फिर्यादीस पाहुन पळुन गेले व काही वेळाने ते परत कंपनीमध्ये आले व फिर्यादीचे कंपनीमध्ये साफ–सफाई करणारे कनीराम शालिकराम सावसाकडे रा.गौंडवाना यांना आरोपी नामे– आकाश कारेमोरे व त्यांचा मित्र यांनी चाकुचा धाक दाखवुन गालावर दोन तिन थापडा मारूण त्याचा जिओ कंपनीचा मोबाईल किंमती १,५००/–रू. चा संगणमत करून जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडिसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार शैलेंद्र नागरे मो.क्र. ७७४३९१९८०९ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा उमरी येथे दि. २८/०६/२०२२ ते १५/०७/२०२२ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गजानन दशरथजी कचडे वय ३५ वर्ष रा उमरी ता. सावनेर यांचे राहते घरातील बेडरूममधील आलमारीत कुलुप करून ठेवलेले जुने वापरते सोन्या–चांदीचे दागीने असा एकुण कि. ६२,७००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री कामठे मो नं. ९९२३२१०३४४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील गोंडेगाव कन्हान येथे दि. २०/०७/२०२२ चे २०.०० वा. ते २१/०७/२०२२ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– शेख सुभ्राती पिरबक्ष मन्सुरी वय ५३ वर्ष, रा. गोंडेगाव कॉलनी कन्हान यांच्या पंचर काढण्याच्या दुकाणातुन रात्री दरम्यान अज्ञात आरोपीने ८ नग लोखंडी डिक्स किंमती प्रत्येकी किंमत १,०००/–रु. प्रमाणे एकुण अंदाजे किंमत ८,०००/–रु. चा मुद्देमाल चोरी करुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मंगेश सोनटक्के मो.नं.९७६७३३१३५६ हे करीत आहे.

**<u>३) पो.स्टे. सावनेर</u>** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील साई कृपा हार्डवेअर हाळी चौक सावनेर येथे दि. १६/०७/२०२२ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ मनिषा गोधळी वय २४ वर्षे रा. पांडूरंग वार्ड एल आय जी कॉलोनी तळेगाव रोड आर्वी ता. आर्वी जि. वर्धा हि साई कृपा हार्डवेअर होळी चौक सावनेर दुकानात सामान खरेदी करीता गेली असता फिर्यादी जवळ असलेल्या बाजाराचे सामानाची पिशवीत ठेवलेली पर्स त्यामध्ये ठेवलेला narzo 50 a कंपनीचा अॅन्ड्रॉइड मोबाईल किंमत अंदाजे १०,०००/—रू. चा कोणीतरी एका काळया रंगाचे पल्सर मोटार सायकलवर डोक्यात हेलमेट घातलेल्या आरोपीने फिर्यादी ने आपले पायाजवळ ठेवलेल्या बाजाराचे सामानाची पिशवीत ठेवलेली पर्स चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रकाश नांदुरकर मो.क्र. ८६०५३८१५९० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**